वर्ष ४३
अंक १

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ
॥ मराठी तितुका मेळवावा ॥

On the web
www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक जानेवारी २०२३

## अध्यक्षीय



नमस्कार मित्रमैत्रिणींनो, सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

१८ डिसेंबर २०२२ च्या 'टाउन हॉल'-ऑनलाईन मीटिंगमध्ये आपण १३ ऑगस्ट ते १८ डिसेंबर पर्यंत केलेल्या कामाचा आढावा व सुमारे वीस प्रकल्पांची माहिती उपस्थितांना दिली. त्यामध्ये प्रामुख्याने सांगायचं तर आपलं बी एम एम २.० app, प्रादेशिक मराठी मैत्री मेळावे (M3)ची घोषणा, मराठी मंडळांबरोबर revenue sharing योजनेची घोषणा व अंमलबजावणी!

नवीन वर्षाच्या या शुभमुहूर्तावर अजून एक घोषणा म्हणजे २०२४ बे एरिया "काय बे" अधिवेशनाच्या करारावर मी, बृहन्महाराष्ट्र मंडळ अध्यक्ष व प्रकाश भालेराव, महाराष्ट्र मंडळ बे एरिया संयोजक यांनी आमच्या टीम्ससोबत २६ डिसेंबर रोजी हस्ताक्षरे केली. सर्व मंडळांचा विकास या आपल्या तत्त्वावर काय बे अधिवेशनात आम्ही काही मूलभूत बदल करणार आहोत. त्याबद्दल माहिती लवकरच मिळेल. अधिवेशनाविषयी अधिक माहितीसाठी तुम्ही bmm2024.org हे संकेतस्थळ bookmarkच करून ठेवा. काय बे! येणार ना?

त्या अगोदर आपण या वर्षीच्या पहिल्या तीन महिन्यामधे प्रादेशिक मराठी मैत्री मेळावे (M3) यांचे आयोजन करणार आहोत. ज्या मंडळांना आपल्या आजूबाजूच्या मंडळाच्या मदतीने प्रादेशिक मैत्री मेळावे आयोजित करायचे असतील त्यांनी १० जानेवारीपर्यंत आम्हाला त्यांचा असा विचार असल्याचे कळवायचे आहे. सर्व मंडळांना M3 ची RFP आतापर्यंत मिळालेली आहेच.

सर्व मंडळांना पुन्हा एकदा आवाहन करतो, की BMM 2.0 app चा तुमच्या कम्युनिटीमध्ये प्रचार करा. या app द्वारे सगळ्या प्रकल्पांची माहिती, नाव नोंदणी लिंक्स, कार्यक्रम, प्रकाशने याबद्दल माहिती मिळणार आहे. तेव्हा तुमच्या ई-डिव्हाइसवर हे ॲप समाविष्ट करण्यासाठी संकेतस्थळ:- **https://bmm2.page.link/bmmapp**

आमचा लाडका भुभु जुडो ज्याने माझ्याबरोबर १२ वर्षांची सुंदर मैत्री निभावली, तो १८ डिसेंबर, २०२२ रोजी पुढल्या आयुष्याच्या प्रवासाला निघाला. त्यासाठी व आपल्या आयुष्यात आनंद आणणाऱ्या आपल्या मुक्या सवंगड्यांसाठी हे दोन श्लोकः-

सुक्ष्मा मातापित्रुजा: सह प्रभुतै: त्रिधा विशोषा: स्यु: ।
सुक्ष्मा: तेषाम् नियता मातापित्रुजा निवर्तंते ॥
पुर्व उत्पंनम् असक्तम् नियतम् महत् आदी सुक्ष्म पर्यंतम् ।
संसरति निरुपभोगम् भावे आधिवासितम् लिंगम् ॥

Microscopic life form, parents and nature together bring one into existence. Of that microscopic life form continues and body perishes.

Primordial, eternal, always, formed from basic elements, सुक्ष्मजीव/microscopic life form continues without carrying any experiences but carrying only भाव/ developed dispositions like a cloth tinged with perfume.

पुन्हा एकदा तुम्हा सर्वांना हे नवीन वर्ष सुखाचे, समृद्धीचे व आरोग्यदायी लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

आपला नम्र,

संदीप दीक्षित (संदीप दीक्षित, अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ)

https://tweeter.com/bmmpresident | https://www.facebook.com/bmm2022president
#bmm2.0 #communityCentricBMM #MandalMember #VruttaSubscriber

## या अंकात

| | पान क्र. |
| --- | --- |
| - अध्यक्षीय | १ |
| - श्रध्दांजली | २ |
| - बृ.म. मंडळ अधिवेशन, बे एरिया २०२४- वार्ता | ४ |
| - लेख:- बोहारीण, | |
| - लेख:- मराठी विश्व- क्लब 55-हॉलिडे पार्टी | ५ |
| - कविता:- खारीचा वाटा , नवीन वर्षाच्या शुभेच्छा | ६ |
| - लेख:- माझी आई-शंभर नाबाद | ७ |
| - लेख:- अदृश्य गिऱ्हाइके | ८ |
| - 'शब्दफोड'- मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा अद्भुत नवा खेळ | ९ |
| - Article:- Strengthen Rational Thinking... | १० |
| - Business Advertisement | ११ |
| - बृ.म. मंडळ प्रकल्प:- पान ३, ५, आणि ................. | १२ |
| - पुरवणी :- कविता- 'सण संक्रात','क्षणचित्रे' | १४-१५ |
| - राशिभविष्य:- जानेवारी २०२३ (On BMM website) | |

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**

**संस्थापक**:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** -विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय -संपर्क:-**
**BMM Treasurer -** Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330 Email- Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर:- Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription



**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50



वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२० तारखेपर्यंत** हाती आलेल्या मजकुरातून **निवडक** मजकूर नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो **युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा.**
**प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही.**
लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.
पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.



**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२-२०२४)**
**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष:-** | संदीप दीक्षित | क्लिवलँड ओहायो |
| **सचिव:-** | अजित नातू | सॅक्रॅमेण्टो, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष:-** | राजन पेडणेकर | टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| **सदस्य:-** | अमर उन्हेकर | लिव्हिंग्स्टन, न्यू जर्सी |
| | सविता मोरे | सिॲटल, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक | वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर | ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत | सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:-** विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय

**वृत्त संपादक:-** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय

**विश्वस्त समिती:**

**अध्यक्ष :-** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन

**सदस्य** :- नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय

**सदस्य** :- सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...



**प्रकाशक:-** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका
**संकेतस्थळ:-** https://www.bmmonline.org



Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.



**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:-**
vinata.kulkarni@bmmonline.org
Or vinata@gmail.com


# श्रध्दांजली

## वासंतीताई आठवले

(१४ फेब्रुवारी, १९३०- १७ डिसेंबर, २०२२)

वॉशिंग्टन डीसी परिसरातील मराठी कला मंडळाच्या एक संस्थापक सदस्य आणि माजी अध्यक्षा वासंतीताई आठवले यांचे १७ डिसेंबर, २०२२ रोजी वयाच्या ९२व्या वर्षी निधन झाले.


त्यांना संगीताची अतिशय आवड होती. त्यांनी भजनी मंडळाचे नेतृत्वही केले. मराठी नाटकांचे समर्थपणे दिग्दर्शन करून त्यांनी अनेक नाटके यशस्वीरीतीने रंगभूमीवर आणली. स्वत: योगाचा सराव करून त्यांनी इतरांनाही त्याविषयी शिकवले. प्रसन्न आणि मदतीसाठी तत्पर असे वासंतीताईंचे व्यक्तिमत्व मेरीलँड-व्हर्जिनिया परिसरातील भारतीय समुदायाला तसेच त्यांच्या सर्व आप्त, स्नेहीजनांना कायम स्मरणात राहील. त्यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो, हीच ईशचरणी प्रार्थना!

***

## डॉ. अरुण तनखीवाले

(सप्टेंबर २०, १९३७- २८नोव्हेंबर २०२२)

दीर्घ काळाच्या आजारानंतर २८नोव्हेंबर २०२२ रोजी, माझे मित्र डॉ. अरुण तनखीवाले गेल्याची दुःखद बातमी कळली; आणि मला गतकाळच्या कांही आठवणी स्मरल्या.



अरुण हे मूळचे नागपूरचे. नागपूरच्या प्रसिद्ध 'तरुण भारत' या वर्तमानपत्रात ते साहाय्यक संपादक होते. त्याचे संपादक होते सुप्रसिद्ध साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर, जे माझ्या आईचे मावस भाऊ होते. त्यामुळे माडखोलकर यांच्या सोबत अरुण मुंबईत आमच्या घरी आले होते. तो काळ होता १९६२चा.

अरुणची व माझी पहिली भेट ब्रुकलिनला डॉ. शरदकुमार दीक्षित यांच्या घरी झाली होती. कारण दीक्षित हे नागपूरचे. नंतर अरुणची भेट नेहमी होत गेली ती न्यू यॉर्कच्या महाराष्ट्र मंडळात. त्यावेळी ते मंडळाच्या कार्यकारिणीत होते आणि समाजकार्यात सक्रीय भाग घेत होते. ते मोकळ्या व विनोदी स्वभावाचे होते. त्यांना संगीत, साहित्य आणि कला याची आवड होती. ते उत्तम तबला-वादकही होते. न्यू यॉर्कच्या मराठी मंडळात होणाऱ्या संगीत कार्यक्रमात व इतर अनेक नामवंत कलाकारांना त्यांनी तबल्याची साथ दिली होती.

अरुण तनखीवाले यांना साहित्याची जाण व आवड असल्याने त्यांनी न्यू यॉर्कच्या मंडळाचे १९९९ व २००१ सालचे असे दोन रंगदीप दिवाळी अंक यशस्वीपणे संपादित केले होते. असे ते अष्टपैलू/हरहुन्नरी होते. त्या दोनही अंकाचे मुखपृष्ठ मी रंगविले होते. त्याचं त्यांना कौतुक होतं. व्यवसायाने ते 'नुक्लीअर मेडिसिन अँड रेडिओलॉजिस्ट' व 'नुक्लीअर मेडिसिन फिजिसिस्ट' होते.


माझ्यापेक्षा ते वयाने (८६) मोठे असले तरीही त्यांचा व माझा निकटचा परिचय होता. त्यामुळे, महिन्यातून एकदा तरी चौकशीसाठी मला त्यांचा फोन येत असे. त्यावेळी ते आपुलकीने विचारायचे, *"जयंता, कसा आहेस तू? सहजच फोन केला. नवीन माहिती काय?..." वगैरे.* आता तो फोन येणं कायमचं बंद झालं, यापेक्षा दुर्दैव ते कोणाचे?

अरुण यांच्या आत्म्यास शांती लाभो आणि या दुःखाच्या प्रसंगी त्यांच्या पत्नी मृणालिनी/शामा व परिवारांस धैर्य मिळो, ही ईश्वरचरणी प्रार्थना व भावपूर्ण श्रद्धांजली!

- **जयंत विठ्ठल कुलकर्णी** (न्यू यॉर्क)

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन प्रकल्प - 'वारसा' - यू ट्युब मालिका

वारसा, जो वडिलोपार्जित आलेला आणि पुढच्या पिढीला सुपूर्त केलेला असा वारसा. मराठी समाजाने उत्तर अमेरिकेत स्थलांतर करताना बरोबर आणला संस्कृतीचा, शिक्षणाचा, आठवणींचा, आशीर्वादांचा आणि मराठी मातीचा वारसा. आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे, हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळं रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून, ते जतन केलं पाहिजे. अशा गोष्टी एकत्रित केल्या, की सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे, "वारसा" हा प्रकल्प.



### वारसा मालिका, भाग पहिला: "तेथे कर माझे जुळती" डॉ. रमेश गंगोळी

अमेरिकेत स्थलांतर १९५८. गणितज्ञ, संस्कृत पंडित, गायक, संगीतकार अशा ऋषितुल्य डॉ. रमेश गंगोळी यांची मुलाखत. डॉ. गंगोळी हे बालवयात आलेल्या शारीरिक आपत्तीवर खंबीरपणे मात केलेले एक असामान्य कर्तृत्वाचे, आदरणीय, अभिमानास्पद आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व. जिथे सहजपणे म्हणावे, "तेथे कर माझे जुळती!"

वारसा मालिकेचा हा पहिला भाग -"तेथे कर माझे जुळती" पहाण्यासाठी, ऐकण्यासाठी संकेतस्थळ:-

https://www.youtube.com/@bmm-varasa/videos

किंवा तुमच्या मोबाईल फोनवरून इथे दिलेला QR code scan करा.

वरील यूट्युब चॅनेलला जरून like आणि subscribe करा.

प्रकल्पामध्ये सहभागी होण्यासाठी:- https://bmm2.page.link/varasa

टीप:- वारसा प्रकल्पाविषयी अधिक माहितीसाठी- ईमेल- varasa@bmmonline.org

***

## बृ. म. मंडळ प्रकल्प - 'आधार'

Helping Marathi Community of North America, during crisis such as Natural calamities (hurricanes etc), untimely deaths, etc.

For more information, Contact Project Lead - BMM Executive Committee member:
**Prasad Panvalkar - Phone:-** 512-294-3229
**Email:-** Prasad.Panvalkar@bmmonline.org

## BMM KARAOKE

Enjoy singing or listening to theme-based songs every 2nd and 4th Sunday from 5 -7PM EST.

Registration link for BMM Karaoke:-

https://bmm2.page.link/karaoke

# बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन,

## बे एरिया २०२४ - वार्ता

**- अश्विनी कंठी**
(महाराष्ट्र मंडळ बे एरिया, कॅलिफोर्निया)



जून २०२४ मधे बे एरियामधे भरणाऱ्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाच्या तयारीला आत्तापासूनच सुरवात झाली आहे बरं का!

अमेरिकेतले आणि जगभरातले मराठी सहृदय एकत्र येण्याच्या या अधिवेशन सोहळ्यात स्मरणिका-चमू / टीम आपले योगदान देण्यास सज्ज झाली आहे.

महाराष्ट्राबाहेर पडलेल्या मराठी माणसाने स्वकर्तृत्वाची मोहोर जगभरात उमटवत असताना आपल्या साहित्य, कला आणि संस्कृतीची जपणूकही तितक्याच आत्मीयतेने केली. याचबरोबर मराठीचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोचवण्याचे अनेकविध प्रयत्न मराठी माणूस करत आला आहे. या वाटेवर ज्या देशात, ज्या गावात तो जाईल तिथल्या संस्कृतीचा रंग गालाला लागला नाही तरच नवल. स्वतःची संस्कृती जपताना, मराठी माणसाने इथल्या अमेरिकन संस्कृतीलाही उत्सुकतेने व प्रगल्भतेने आत्मसात केले आहे. कवी प्रकाश होळकर यांच्या शब्दात,

"आठवांच्या पारंबीला, बांधू एक झुला
तुझे आभाळ मला घे, माझे आभाळ तुला"

असे म्हणत इथला मराठी माणूस दोन अवकाशाचा सुंदर मिलाफ करून कसा रहात आला आहे, याची झलक यावेळच्या अधिवेशनाच्या स्मरणिकेतून करून देण्याचा आमचा मानस आहे.

या स्मरणिकेच्या संपादिका आहेत, अश्विनी कंठी. मानद सल्लागार आहेत माधव देशपांडे आणि कार्यकारी समितीतर्फे मार्गदर्शन करत आहेत, अनिता कांत. स्मरणिकेसंबंधित व अधिवेशनाविषयी अधिक माहिती घेऊन येत आहे, पुढील महिन्याच्या बृहन्महाराष्ट्र वृत्तात!

धन्यवाद!

***

# बोहारीण

**- 'मराठी विश्व न्यू जर्सी'-'विश्वांकुर' आणि 'क्लब 55' टीम**

आठवतं तुम्हाला? भारतात पूर्वी आपल्या घरी बोहारीण यायची. मग आई तिला चांगले, नवे-जुने कपडे द्यायची आणि मग खूप घासाघीस करून त्यांच्या बदल्यात एखादं छानसं पातेलं, डबा मिळवायची. देणारी पण खुश आणि घेणारी पण खुश!

सगळ्या जुन्या गोष्टी आपल्याला नव्याने आवडायला लागतात, तसंच काहीसं आमचंही झालं. 'मराठी विश्व न्यू जर्सी'-'विश्वांकुर' आणि 'क्लब फिफ्टी फाईव्ह' टीम ने 'साडी/लेडीज इंडियन आऊटफिट ड्राईव्ह' ह्या उपक्रमात अगदी हीच कल्पना वापरली.

कोणीतरी वापलेली साडी आपण विकत घ्यायची आणि ती नेसायची, हे सहजासहजी पटणारं नव्हतं आणि म्हणूनच यासाठी हवा होता नवा दृष्टिकोन. थोड्याशा वापरलेल्या भारीतल्या साड्याच नाही तर काही नवीन साड्या सुद्धा दान ('डोनेट') करणं हे काम आम्ही महिलांनी अत्यंत उत्साहाने केलं. त्यामागचा हेतू हाच, की ती साडी कोणाला तरी आवडेल, कोणीतरी ती विकत घेईल, कोणीतरी ती आवडीने वापरेल आणि त्यातून 'मराठी विश्व कम्युनिटी सेंटर' साठी निधी उभा राहील.

कल्पना मनात रुजली. स्वयंसेवक पुढे आले. न्यूजर्सीमधे वेगवेगळ्या शहरात 'कलेक्शन पॉईंट्स' ठरले. 'मराठी विश्व कम्युनिटी सेंटर'मधे 'साडी-सेल'चा दिवस निश्चित झाला. माहितीपूर्ण फ्लायरदेखील तयार झाले आणि सोशल मीडियाच्या वेगवेगळ्या माध्यमातून (मराठी विश्व सख्या, मराठी विश्व व्हॉट्सॲप, फेसबुक, इंस्टाग्राम, ई-मेल) या उपक्रमाची जाहिरात करण्यास सुरुवात केली.

प्रत्येक 'कलेक्शन सेंटर'वर भरघोस प्रतिसाद मिळाला. दान स्वरूपात दिलेल्या साड्यांचे फोटो काढून, ते 'अपलोड' करून 'प्री-सेल'साठी 'गुगल ड्राईव्ह'ची लिंक तयार झाली. ऑनलाईन साडी विक्रीसाठी (प्रत्येकी केवळ १०/२० डॉलर्स किमतीला) आमची टीम सज्ज झाली. लवकरच डोनेट केलेल्या साड्यांच्या फोटोंवर 'Hold & Sold' चे शिक्के दिसायला लागले आणि ह्या उपक्रमासाठी निधी जमा होऊ लागला.

दोनच आठवडयांनी साडी सेलचा दिवस उजाडला आणि 'मराठी विश्व कम्युनिटी सेंटर'मधील सर्व टेबलं साड्या आणि 'लेडीज इंडियन आऊटफिट्स'नी तुडुंब भरली. विक्री केंद्रावरील स्वयंसेवक, कोषाध्यक्ष यांच्या चेहेऱ्यावरील स्मितहास्य ह्या उपक्रमाच्या यशाची पोचपावती देत होतं.

एकंदर ८५०० डॉलर्स पेक्षाही जास्त निधी ह्या उपक्रमातून जमा झाला. उपक्रमाच्या यशाचे श्रेय सर्व स्वयंसेवक, साडी/आऊटफिट डोनर्स तसेच ह्या दान स्वरूपात दिलेल्या साड्या/आऊटफिट्स विकत घेऊन या उपक्रमाला ज्यांनी हातभार लावला त्या सर्वांनाच जाते.

विक्री न झालेल्या सर्व साड्या/आऊटफिट्स सुमारे ३५ बॉक्समधे भरून स्वयंसेवकांनी टेक्सास मधील 'PEOPLE'S IMPACT NETWORK' ह्या सेवाभावी संस्थेला त्यांची 'प्रीपेड फेडेक्स लेबल्स' वापरून पाठवले. ह्या उपक्रमाने ही आधुनिक बोहारीण पर्यावरणालाही (Reduce-Reuse-Recycle) मदत करून गेली.

काय मग, अशी आधुनिक बोहारीण तुमच्याही मराठी मंडळात हवी का?

**टीप:-** काही क्षणचित्रे-पुरवणी विभागात- पान १५ वर.

***

## मराठी विश्व- 'क्लब 55' हॉलिडे पार्टी

**- सुचेता साठे** (न्यू जर्सी)

१७ वर्षांपूर्वी न्यू जर्सीमधे मराठी विश्व कार्यकारिणीतील निवृत्त झालेल्या उत्साही मंडळींनी काळाची गरज ओळखून हा 'क्लब 55' सुरू केला, तेव्हा आम्हा मैत्रिणींना आपण खूप तरुण आहोत असं वाटे. पाहता पाहता वयाची ५०-५५ ते साठी उलटली तेव्हा जाणवलं, अरेच्या आपणही आता या क्लबमधे जायला पाहिजे. माझी मैत्रीण नीलम त्यांची कार्यक्रम पत्रिका बनवते. तेव्हा ती नक्की येणार आहे याची खात्री करून मी प्रथमच 'क्लब 55'च्या वार्षिक जेवणाच्या कार्यक्रमास जाण्याचे ठरवले.

रेस्तराँचा पार्किंग लॉट भरल्याने शेजारच्या लॉटमधे गाड्या पार्क होताना पाहिलं आणि म्हटलं हेच ते ठिकाण. पाऊस धो धो पडत होता. गाडीतून पटापटा उतरणारी वृद्ध जोडपी बालमनाच्या उत्साहाने जाताना दिसली. दारातच नंदा पडते आणि मोना वासुदेव नावांची यादी घेऊन बसले होते. मी रांगेत उभी राहिले. काही महाभाग मंडळी माझ्या मागून पुढे जात, अरे नाव दिलयं ना, पुन्हा काय, असे म्हणत आत जाण्यास उत्सुक होती.

जवळ जवळ १५०-१६० माणसांचा समुदाय आणि त्यात बरेचसे चेहरे ओळखीचे बघितल्यावर मला मराठी विश्व'मधे आम्ही तरुण असताना जात असू तेव्हाचे दिवस आठवले. 'Name-tag' अथवा 'assigned' टेबल नव्हते. नीलमने माझ्यासाठी खुर्ची ठेवली होती. मैत्रीण असावी तर अशी! शरीरावर वयाच्या खुणा दिसल्या तरी मनाने तरुण व उत्साही मंडळींची फोटो काढण्याची धडपड गंमतीची वाटली. माझे मोठे दीर व जाऊबाई यांच्या स्नेही वर्तुळातील मैत्रिणी त्याच माझ्याही न्यूजर्सीतल्या पहिल्या मैत्रिणी! त्यामुळे हेमा, प्रज्ञा यांना भेटल्याचा आनंद काही औरच होता. हेमाबरोबर मीही एक फ्रेम समोर धरून फोटो काढला तेव्हा मला महालक्ष्मीच्या जत्रेची आठवण झाली.

जेवायला शाकाहारी, मांसाहारी भरपूर खाद्यपदार्थ, तीन मिष्टान्न/डीजर्ट आणि चहाचा आस्वाद घेत मनसोक्त जेवले. दारूही उपलब्ध होती. मी पीत नसल्याने फारसा फरक पडला नाही. पण दुपारच्या वेळी 'ओपन बार' या वयातल्या लोकांसाठी कितपत योग्य, ही शंका मनात आली. असो.

"Surprise" कार्यक्रम बरोबर वेळेत सुरू झाला. मानसी करंदीकर ने 'बुगडी माझी सांडली ग' या गाण्यावर सुंदर लावणी सादर करून वन्समोर मिळवला. स्मिता व विजय देशपांडेंनी दोन/तीन मराठी गाणी सादर केली. तांत्रिक बिघाडामुळे व्यत्यय आला तरी सर्वजण शांत आणि समंजसपणे बसले होते. त्यानंतर 'जान्हवी राणे'ची मुलाखत झाली. 'Mrs. Universe' साठी तिची निवड झाली हे खरोखर वाखाणण्यासारखे आहे. स्वतःची किडनी दान केल्याची गोष्ट तिने सांगितली तेव्हा तिच्या सुंदर बांध्यासोबत सुंदर मनाची ओळख झाली. त्यानंतर मानसीने 'वाजले की बारा' या गाण्यावर पुनः एकदा लावणी सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.

वेळेत कार्यक्रम सुरू झाला तसाच वेळेत संपलाही. नंदा पडतेंची शिस्त आणि शकुन, मोना, अलका यांची त्यांना साथ बरंच काही शिकवून गेली. आज त्यांना गरज आहे ती आमच्या सारख्या मंडळींची. त्यांनी हे दालन आपल्यासाठी उघडून दिलंय ते पुढे नेण्याची जबाबदारी आपल्या पिढीने घ्यावी व त्यांची आधाराची काठी बनण्यास तयार व्हावे, हेच स्वप्न बाळगते.

***

## बृ. म. मंडळ प्रकल्प

### खगोलशास्त्रावर व्याख्याने आणि परिसंवाद

बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणीच्या या नवीन प्रकल्पामधे उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी खगोलप्रेमींना एका छताखाली आणून विचारांची आणि माहितीची देवाणघेवाण व्हावी, या उद्देशाने दर महिन्याला खगोलशास्त्रावर व्याख्याने आणि परिसंवाद आयोजित केले जातील. थेट प्रात्यक्षिके आणि अवकाशातील अद्‌भूत गोष्टी पाहण्यासाठी रात्रीचीदेखील खगोलशास्त्रीय सत्रे असतील. ह्या हौशी खगोलशास्त्र-समुदायात भाग घेण्यासाठी खालील संकेतस्थळावर नावनोंदणी करावी.

**https://bmm2.page.link/astronomy**

**नववर्ष इ.स. २०२३ चे सहर्ष स्वागत !**

**बृहन्महाराष्ट्र वृत्ताचे लेखक, वाचक, हितचिंतक, जुने-जाणते दीर्घकालीन सदस्य, नवीन सदस्य आणि व्यावसायिक जाहिरातदार - सर्वांना नवीन वर्ष २०२३ निमित्त अनंत शुभेच्छा!**

# खारुताईच्या वाटा






**- कांचन गोडबोले** (क्लीव्हलँड, ओहायो)

खारुताईकडे बघताना, मनात येते, की कसे असेल हिचे नवीन वर्ष? सतत मेहनतीचे आणि तेवढेच निरागस आयुष्य असलेली ही खारुताई खिडकीतून न्याहाळताना ही कविता मला सुचली. 'नेचर'र्स गार्डनर 'म्हणून तिचा- निसर्गातील खारुताईचा वाटा, तिने सांभाळला आहेच. पण तिच्या 'खारुताईच्या वाटाही' ती शोधत असते. अमेरिकेत २१ जानेवारी, हा **"National Squirrel Appreciation Day"** एक 'फन हॉलिडे' म्हणून साजरा केला जातो. तर हा दिवस आणि नवीन वर्षानिमित्त ही माझी कविता, धन्यवाद.

एकदा, एक दिसली छोटीशी खारुताई,
किंव किंव आवाज करत स्वतः शीच बोलत होती काहीबाही!

कसल्यातरी गोष्टींची तिची चालू साठवण,
ऋतू बदलतो तशी जबाबदारीची आठवण !

काहीतरी इकडे तर काहीतरी तिकडे ठेवावे,
इकडून तिकडे, तिकडून इकडे, दुडूदुडू धावत राहावे!

नेहमीच उत्साही, नेहमीच आनंदी,
कशी राहते ती, अशी छान स्वछंदी?

तिच्या डोक्यात नसतील का, चिंतेच्या काही गोष्टी?
सोबतीला अवघा निसर्ग आणि आहे सगळी सृष्टी!

घेत असते कायम आजूबाजूचा कानोसा,
सतत कार्यशील राहणे, असा घेतला तिने वसा!

सहन करते, प्रतिकूल हवामानाचे विरोध आणि बोध,
अध्यात ना मध्यात कुणाच्या, घेत राहते स्वतःचा शोध!

झेलत असते निसर्गाच्या संकटां,
तरीही शोधून काढते, तिच्या खारुताईच्या वाटा!

स्वावलंबी वृत्तीने मजेत राहते प्रत्येक वर्ष,
हाच तिच्या छोट्या गोष्टींचा, असे मोठा आदर्श!

***

# नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

**- अनिता म. कांत** ( सॅन होजे, कॅलिफोर्निया)



धूसरल्या ऐन्यास पुसुनी
पुन्हा आपुली पहा छबी
क्षितिजावरती रम्य हासरी
नववर्षाची उषा उभी ॥१॥

पानगळीसह गळून गेल्या
जुन्या वेदना, आठवणी
फुंकर घालून उडवे त्यांना
शिशिरामधला वात झणी ॥२॥

शमले क्रन्दन, सरले वादळ
भरे शांतता जळी-स्थळी
शुभ्र हिमावर रविकिरणांची
प्रभा फाकली सोनसळी ॥३॥

झटकुनी टाका मरगळ आणिक
भरा उभारी श्वासांत
नवीन आशा, नवी स्पंदने
धडधड करुद्या हृदयात ॥४॥

आयुष्याच्या ग्रंथामधले
पान उलटुनी पहा जरा
हात पसरुनि तुम्हा खुणवती
नवीन ध्येये, नवी धुरा ॥५॥

***

# बृहन्महाराष्ट्र वृत्त- ऑनलाईन विभाग

**- पुरवणी विभाग:-**
**https://bmmonline.org/vrutta-supplements/**
**- कविता:- सण संक्रांत प्रिया गोडबोले** (न्यू जर्सी)
**- लेख बोहारीण (पान ४-५) संदर्भात क्षणचित्रे**
**- राशिभविष्य:- जानेवारी २०२३- दादा दामले** (न्यू जर्सी)
**https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

# माझी आई -१०० नाबाद

**- वसुंधरा पर्वते** (फॉस्टर सिटी, कॅलिफोर्निया)



माझी आई-**सुमित्रा शंकर देवधर**. १२ डिसेंबर २०२२ ला तिला **शंभर वर्षं** पूर्ण झाली. हा शतकपूर्तीचा सोहळा शिकागोच्या एका देवळात थाटात साजरा झाला. माझा भाऊ सुभाष आणि भावजय रेखा देवधर यांनी हा अपूर्व सोहळा आयोजित केला होता. शंभर वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडातले अनेक फोटोंचं कोलाज असलेलं एक ब्लँकेट, एक फ्रेम, तिचं रेखाचित्र आणि बरीच ग्रीटींग्ज यांनी एक टेबल सजलं होतं. तिच्याबद्दल अनेकजण भरभरून बोलले. त्यातलं ती काहीच ऐकू शकत नव्हती; तरीही ती खूपच खूष होती. पाच तास एका जागेवर न कंटाळता बसली होती.

तिच्यासाठी मी १०० शुभेच्छापत्रांचा **संकल्प** केला होता. तिच्या चाहत्यांनी भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे शुभेच्छापत्रांची संख्या १४४ झाली, ही आनंदाची गोष्ट. या पत्रांचं संकलन करून पुस्तकरूपात मी तिला दिलं.

१९२२ साली खेड्यात जन्माला आलेली माझी आई- तिच्या वडिलांनी तिला फायनलपर्यंत शिकवलं आणि लग्न करून दिलं. लग्नानंतर मुंबईत अहमद सेलर- बिल्डिंगमध्ये स्वतंत्र बिऱ्हाड केलं. माझ्या वडिलांनी तिला शिवणकामाचा कोर्स करायला उत्तेजन दिलं. तिनंही मन लावून तो कोर्स केला. मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत शिवण शिक्षिकेची तिला नोकरी मिळाली. तिने अतिशय कुशलतेने नोकरी व संसार सांभाळला. शाळा नेहमी सकाळची, सकाळी सात वाजता घर सोडायचं, त्याच्या आत स्वयंपाक. नवनवीन पदार्थ करण्यात तिचा हातखंडा होता. तिच्या हातच्या अनेक पदार्थांची आठवण अजूनही अनेकांना आहे. नऊवारी चापून नेसलेलं फॅन्सी लुगडं, केसांचं चक्र-गळ्यात पर्स, अशी पायातल्या चपला सटासट वाजवत भराभरा जिना उतरणारी तिची मूर्ती माझ्या अजून डोळ्यांसमोर आहे.

आमचं घर म्हणजे ११ बाय १७ ची एक खोली आणि दोन छोट्या गॅलऱ्या. एवढ्याशा खोलीत सगळं जिथल्या-तिथे असायचं. माझ्या मैत्रिणी, आईवडिलांच्या शाळेतले शिक्षक यायचे, वडिलांच्या सामाजिक कामासाठी सभा व्हायच्या, नातेवाईक राहायला यायचे. जागा लहान ही अडचण कधी भासली नाही. या सगळ्यांचं हसतमुखाने खाण्यापिण्यासकट स्वागत करण्याचं कसब तिच्यात होतं. माझे वडील एकदम पुरोगामी. खरं म्हणजे मोलकरणीचा कप वेगळा ठेवण्याचा तो काळ होता. पण आमच्याकडे असा भेदभाव नव्हता. वडिलांचे असे मित्र, त्यांच्या बायकांना कुठल्याही प्रकारचा मज्जाव नव्हता. या गोष्टीला आईचीही मान्यता होती, तिचंही मन मोठं होतं.

माझ्या वडिलांनी तिला नुसतं नोकरी करायला प्रोत्साहन दिलं एवढंच नाही, तर त्या काळात दुर्मिळ असलेलं स्वातंत्र्य दिलं. पैशाचे व्यवहार करणं, कुठलीही खरेदी करणं, बाहेर जाणं-येणं यासाठी कुठलंही बंधन टाकलं नाही, उलट उत्तेजन मात्र दिलं आणि मुख्य म्हणजे तिच्यावर विश्वास टाकला. त्यामुळे तिचा आत्मविश्वास वाढला आणि तिच्या अंगभूत गुणांना वाव मिळाला.

देवाधर्माचं ती फारसं करीत नाही पण कुणासाठी काही करताना किंवा देताना हात आखडता घेणं तिला माहीतच नाही. अजूनही वयाच्या शंभराव्या वर्षी इतरांना देण्याची तिची वृत्ती कायम आहे. घरी येणाऱ्याला काहीतरी खायला घातल्याशिवाय जाऊ द्यायचं नाही आणि कुणाकडे जातानाही काहीतरी खाऊ-तोसुद्धा घरी केलेला -घेतल्याशिवाय जायचं नाही, हा तिचा दंडक. अजूनही कुणी घरी यायचं म्हटलं, की काहीतरी विणलेलं- भरलेलं तिचं तयार असतं. मग तो लोकरीचा छोटंसं आसन किंवा हार असेल. याशिवाय हाताने केलेले गव्हले ही तिची खासियत. माणसं जोडण्याची कला तिला अवगत आहे, मग ते नातेवाईक असो की परिचित असो, भेटल्यावर आवर्जून सगळ्याची चौकशी ती करते. अनेकांच्या वाढदिवसांना आजवर तिने आठवणीने फोन केले आहेत. या वयातही तिचा हात जरासुद्धा कापत नाही, लिहिताना अक्षर एकसारखं आणि वळणदार- त्यावर वयाचा यत्किंचितही परिणाम झालेला नाही. तिच्या हाताची बोटं सारखी चालू असतात त्यामुळेच हे असेल कदाचित.

गेली ३५ वर्षं ती माझ्या भावाकडे शिकागोला अमेरिकेत राहते. त्यापूर्वीचं तिचं आयुष्य मुंबईत गेलं. माझा भाऊ आणि भावजय यांनी तिची आजवर जी सर्वतोपरी काळजी घेतली, केवळ त्यामुळे ती आजचा दिवस बघते आहे. सुरुवातीला अधून मधून तिची फेरी भारतात होत असे, मात्र गेल्या दहा वर्षात गेलेली नाही. तशी घरातल्या घरात वॉकर घेऊन चालू शकते, आता ऐकू अजिबात येत नाही. बाकी सर्वार्थानी ठीक आहे. वाचू शकते, लिहूही शकते. आजवर तिने लिहिलेल्या अनेक आठवणींचं एक मोठं बाडच होईल. वेळच्या वेळी खाणं-पिणं ती मनापासून करते. विशेष म्हणजे स्वतःची औषधं ती स्वतः घेते. स्वस्थ आणि शांत असते, माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत, असं वारंवार म्हणते.

अशी ही माझी हसतमुख, सतत उद्योगी आणि सर्वांना हवीहवीशी वाटणारी आई-तिला साष्टांग प्रणिपात!

***

# अदृश्य गिऱ्हाइके

**- मोहन रानडे** (मूर्सटाउन, न्यू जर्सी)



मोबाईल फोन आणि कॅमेराच्या युगात स्वतःचा चेहेरा लपवण्यास तशी इच्छा शक्ती लागते अथवा स्वतः जगाच्या बरेच मागे असावे लागते. ५० वर्षांपूर्वी तशी परिस्थिती नव्हती. चित्र, नाट्य क्षेत्रातील व्यक्ती पडद्यावर अथवा प्रत्यक्ष दिसत. इतरांचे मात्र वृत्तपत्र अथवा मासिकात फोटो छापून आले तर त्यांचे चेहेरे ओळखीचे होत असत. रेडिओवरील निवेदकांचे तसे नसे. बिनाका गीतमाला प्रस्तुत करणारा अमीन सयानी कसा दिसत असेल हे जाणून घेण्याची मला त्यावेळी खूप उत्सुकता होती. त्याचा चेहेरा माहीत होण्यास काही वर्षे जावी लागली.

काळ बदलला आणि परिस्थिती बदलली. आता आपला चेहेरा कितीवेळा जोपासला जात आहे. ईमेल, फेसबुक-पेज आणि इतर सगळीकडे स्वतःची ओळख होण्यास स्वतःचे फोटो टाकण्याची सोय असते. त्याला काही अपवाद असतात, परंतु तुरळकच. आपल्या ग्राहकांना जाणून घ्या, हा उद्योग यशस्वी होण्याचा मूलमंत्र दिला आहे. तो मलासुद्धा पाळावा लागतो.

माझा उद्योग असल्याने काही मित्र सोडले तर सर्वच ग्राहक मला चेहेऱ्याने त्यांची प्रत्यक्ष भेट होईपर्यंत अनोळखीच असतात. फोनवरून झालेल्या बोलण्यावरून मी ग्राहकांबद्दल काही अंदाज मनात बांधलेला असतो. प्रत्यक्ष भेट होताच माझा अंदाज चुकला होता असे काहीवेळा प्रत्ययास येते. उद्योगाचा मालक म्हणून मला सर्वच ग्राहकांची ओळख करून घ्यायची असते, मात्र तशी काही तुरळक ग्राहकांनाच माझ्याशी ओळख वाढवायची असते. ओळख वाढली, की साहजिकच फक्त ऑर्डर करण्यापुरते फोनवरील संभाषण न थांबता एकमेकांबद्दल इतर चौकशा सुरू होतात. त्यातून ग्राहकाशी जवळीक वाढते. मित्रत्व निर्माण होते.

विशेषतः उतारवयात एकटे मागे राहिलेल्या अथवा वार्धक्यात भारतातून मुलामुलींकडे कायमचे वास्तव्यास आलेल्या ग्राहकांचा यात समावेश असतो. ज्यात पुरुष आणि महिला दोन्ही असतात. मी भारतातील कुठला या प्रश्नाने संवाद वाढायला सुरुवात होते, त्यातून कधी ओळखीचे सामायिक मित्र, नातेवाईक सापडतात.

मी मराठी खाद्यपदार्थांचा विक्रेता असल्याने माझी विक्री वाढली तर मला ती हवीच असते. पण माझे काही ग्राहक माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त वजनाचे पदार्थ मागू लागले, की माझे मन द्विधा होते. तुम्ही एवढे का मागवत आहात, असेपण विचारता येत नाही किंवा ग्राहकाला एवढ्याची जरुरी नाही, असे ठरवायला मी त्यांचा पालक अथवा डॉक्टरसुद्धा नसतो. काही ग्राहक त्यांना या वस्तू वरचेवर का लागतात याचा खुलासा करतात. अमेरिकन पदार्थ अजिबात न आवडणे हे त्याचे बऱ्याचवेळा प्रमुख कारण असते. असे ग्राहक प्रत्यक्ष भेटण्याचा योग अगदी क्वचितच येतो. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा कोणताच अंदाज मला बांधता येत नाही.

काही वर्षांपूर्वी असाच माझ्या वयाचा एक मराठी नकळत माझा फोन-मित्र झाला. ऑर्डरचे पैसे चेकने देऊ लागला, चेकबरोबर मला पत्र पाठवू लागला, पदार्थांबरोबर संगीताच्या सीडी मागवू लागला, सीडी आवडली तर त्यातील गायकांचे त्यांना पत्रे पाठवण्यासाठी पत्ते मागू लागला. पहिल्या काही दिवसात माझ्या लक्षात आले, की तो एकटा आहे. त्याच्या पत्त्यावरून तो असिस्टेड लिव्हिंगमध्ये राहात आहे हे मी जाणले. माझ्याकडील वस्तू सोडून इतर वस्तू त्याला मिळवून देण्यास माझी मदत होईल का, अशी विचारणा होताच त्याचे अमेरिकेत कुणी नाही का, हा प्रश्न मला विचारणे भाग पडले आणि माझी इच्छा नसताना त्याची लाईफ स्टोरी त्याने मला सांगितली. बायको व मुलगी यांनी त्याला असिस्टेड लिव्हिंगमध्ये राहणे भाग पाडले होते, असे त्याचे म्हणणे. निर्णयात बायकोचीपण काही बाजू असणार हे मी जाणून होतो. माझा ग्राहक तरुणपणी अमेरिकेतील उत्तम कंपनीत नोकरीला होता. त्याच्या दोन भावांपैकी एकाशी तो त्यातल्यात्यात संवाद करीत असे. दर १५ दिवसांनी त्याचा फोन यायचा. कधी काही ऑर्डर करण्यास, कधी निव्वळ काही कारण काढून माझ्याशी बोलण्यास! हळूहळू मी फोन घेणे टाळू लागलो. मग तो मेसेज ठेवून फोन करण्याचे कारण सांगत असे. त्याला असिस्टेड लिव्हिंगमध्ये मिळणारे जेवण अजिबात आवडत नसे. माझ्याकडील पदार्थ खाणे हा त्यावरचा उपाय नाही, हे मी आडून आडून सांगत असे. मी तीन महिने भारताला गेलो, की त्यांची पंचाईत होतं असणार हे मला जाणवायचे.

काही महिन्यांपूर्वी मी परगावी गेलो होतो तेव्हा त्याचा फोन येऊन गेला. मेसेज ठेवला नव्हता पण लवकरच त्याच्या भावाचा मेसेज आला, की त्याला हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे आणि मी त्याला फोन करावा, अशी त्याची इच्छा आहे. मी फोन केला. तेव्हा नाका-तोंडात ट्यूब्स असल्याने त्याचे बोलणे मला कळेना. 'यातून बरा हो मग नक्की बोलू', असे आश्वासन देण्यापलीकडे मी काही करू शकत नव्हतो.

एका आठवड्याच्या अंतराने त्याच्या भावाचा 'तो गेला' असा मेसेज आला. माझा आणखी एक अदृश्य ग्राहक काळाआड गेला होता.

***




## मराठी भाषकांसाठी मनोरंजनाचा अद्भुत नवा खेळ

**आवाहन:** कोणत्याही भाषेत अशी रचना करणे शक्य आहे का, की त्या रचनेमधील शब्दांची फोड केल्याने नवीन अर्थपूर्ण आशय निर्माण होऊ शकेल? मराठी भाषेत हा प्रयोग गंमतीचा व सहजसाध्य असावा या अंदाजाने हा खटाटोप! अशी रचना म्हणीसारखी संक्षिप्त, विशेष अर्थपूर्ण किंवा गहन विचारप्रवर्तक असल्यास अधिक छान!
उदाहरणार्थ खाली दोन रचना दिल्या आहेत.

१. (चाल/वृत्त:- वसंततिलका)
**'सासू न सून सदनीं !... नच हा तमाशा?'**
(शब्दफोड करून)
**'सासू नसून सदनीं, न चहात माशा'**




२. (चाल/वृत्त:- पंचचामर)
**'धरून कागदा करीं, सुरेख रेख रेखु रे'**
(शब्दफोड करून)
**'धरू नका गदा करीं, सुरे खरे, खरेखुरे'**



तुमची शब्दरचना वरील उदाहरणांप्रमाणे मात्राबध्द पद्य असणे आवश्यक **नाही.** तुम्ही रचना **गद्यस्वरूपात छोटेसे अर्थपूर्ण वाक्य करू शकता.** मात्र वरील उदाहरणे पाहिल्यावर लक्षात येईल, की तुमच्या रचनेच्या दोन्ही ओळीमधील अक्षरे सारखी हवी आणि दुसऱ्या ओळीत शब्दांची फोड केल्याने त्यातील आशय पहिल्या ओळीपेक्षा नवीन निर्माण होणे आवश्यक आहे.

"शब्दफोड" खेळात भाग घेण्यांस इच्छुक असणाऱ्यांनी आपली रचना **arvind.narale@sympatico.ca आणि vinata@gmail.com** या दोन्ही ईमेल पत्त्यांवर **महिन्याच्या २० तारखेपर्यंत, आपले नांव, गांव यांच्या उल्लेखासह** पाठवावी. आमच्याकडे आलेल्या रचनांमधील अर्थपूर्ण आणि उत्तेजनार्थ रचना बृहन्महाराष्ट्र वृत्ताच्या पुढील अंकात प्रकाशित करण्यात येतील. रचनांमधे काही सुधारणा आवश्यक असल्यास त्याबद्दल अरविंद नारळे आपणांस तसे सुचवतील. तेव्हा,

चला उचलू लेखणी
शब्द चितारू अंतरंगातुनी
अन् तेच शब्द फोडुनी
अर्थांस देऊ नवी कलाटणी

\- **विनता कुलकर्णी** (शिकागो)

***

टीप:- "शब्दफोड" या सदराची कल्पना, वर दिलेली दोन उदाहरणे, त्यास अनुरूप रेखाटलेली चित्रे व शीर्षकचित्र हे सर्व टोरांटो कॅनडा येथे स्थायिक आर्किटेक्ट, ख्यातनाम चित्रकार व लेखक - **अरविंद नारळे** यांची निर्मिती आहे. "शब्दफोड" या खेळाविषयी वाचकांचे **विचार व काही सूचना** असल्यास **arvind.narale@sympatico.ca या ईमेल पत्त्यावर अवश्य कळवा.**

# Strengthen Rational Thinking: Be Proactive

- **Sunil Deshmukh** (Miami Beach, FL)



Indians are world renowned experts in medicine, engineering, supply chain and inventory management, complex computer programming requiring logical thinking, sophisticated engineering processes, assembly line manufacturing and much more that need verifiable proof and critical analysis as foundational skills. They lead international corporations and scientific businesses. But when it comes to applying that critical analysis to the matters of faith, God, and the concepts of soul, rebirth, Good/Bad Deeds accounting, etc., many of the same experts in critical thinking surrender to blind faith, mere beliefs and even aggressive illogic!

In general, many educated middle class Indians have a split personality when it comes to ordinary/professional matters versus the faith/spiritual matters. This paradox is more evident among the educated urban people than the rural, semi-educated ones. They are very skeptical of everything and don't trust anything or anyone easily, over analyzing, inspecting with a critical eye and just being suspicious of all things, demanding proof even for simple things in life. That is evident from their practices-- from mundane things like buying vegetables in the bazar to financial and personal transactions. But when it comes to blindly believing the Babas, Matas and Gurus or the stories about the Gods or Salvation, all skepticism melts away and the same person is ready to believe in soul, rebirth, God, etc. without a question, give away money, material things to such Gurus or causes in return for a vague promise of Moksha or some other dubious spiritual gains!

In fact, the blind faith and their refusal to apply logic degenerates their thinking [!] into fanatic zeal to prove everything in the religious books to be correct and true with contorted logic. Good examples are: even many doctors firmly believe that they had microsurgery 3000 years ago as proved by the Ganesha story, or try to justify the story of Maruti flying with a mountain in his hand and a crocodile getting pregnant by swallowing his sweat to produce a son as an example of IVF [ In-Vitro Fertilization] in the old days!

Even many highly educated professionals in engineering, medicine, finance and science who apply rational inquiry, logic, precise process methodologies and critical analysis in their respective professions, suddenly lose all critical thinking and logical inquiry when it comes to the religious and spiritual matters.

**Rationalism to the Rescue:**

There are however, many Marathi NRIs who feel uncomfortable with the rampant spread of blind faith, ritualism and even aggressive fundamentalism based on the hate of "others" within our own community, even among the highly educated people. They would rather see the true Indian values like "He Vishwachi Majhe Ghar" and "Vasudhaiva Kutumbakam" being practiced in our daily lives and a rational, logical attitude be the foundation of our thinking in all matters.

Many Marathi rationalists have come together to start a forum for discussions, exchange of ideas and "Vichar Manthan" on inculcating scientific, logical and rational thinking and actions with the Marathi NRI community. For those who are interested, contact

**Ashish Mahabal**, email addresses:- mahabal.ashish@gmail.com or **Sunil Deshmukh** sunild@aol.com

**Benefits of Rational Thinking:**

The benefits of rational thinking are enormous and obvious. Rational and scientific thinking opens and broadens minds and intellect. Only such minds can innovate in this creativity and innovation based economy. Closed minds with blind faith, illogical thinking and ritualism with the hate of "others" in their hearts can never be creative, innovative and happy. Rationalism is thus, the key [ Guru Killi] to happiness and progress in life. Free thinkers unbound by preconceived notions and restrictive edicts, practices and norms can actually innovate on all fronts in life, be more confident, happy, and even wealthy!

Here is a chance for all highly educated professionals to apply the same knowledge, skills and critical thinking to the concepts of soul, God, rebirth and afterlife that have almost become a part of the Indian DNA. Applying "Vivekwadi" and "Buddhi Pramanyawadi" rational thinking to the matters of blind faith and false pride in the mythical stories and glories of the past and the present matters will enrich our lives and help make better decisions in all aspects if life.

So, let's embark on this logical and rational journey without fear, pre-conceived notions and an open mind with willingness to go where the logic and facts take us! Maharashtra has always led India on the intellectual front and it's time to do that again in our Karmabhoomi here.

***

## Greetings !

## Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status.

**You get a tax deduction and do not pay any commission.**
**You instruct and send, we deliver.**
**An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape.**
**India recipients of your giving need not be a registered charity.**
**Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive. They do not even need tax exemption (80-G,FCRA).**
**FSC is the answer. For more detail. Visit our Website "WWW.SmallCharity.Org" Or**
**Email to Admin@SmallCharity.Org**
**You will hear from:**
**Ramesh Sarva, CPA, 183 S. Broadway,#210, Hicksville NY 11801**

## Join Donor List

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA,MD
KIRAN & NANDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR & ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLKAR
KASI & GEETHA GABBITA
RAJESH & SUMANA RAO
RAMESH GAONKAR
CHANDRA VARIA
NATWARLAL & KALI RAMANI
BHANJI & MANSI KUNDARIA
JITU & KOKILA PADALIA
DALSUKH & ILA MADIA
HIMAT & MINA TANK
MUKESH & VIBHA SHAH
SUMANT SNEHALATA PANDYA
MOHAN & RAMA PATEL
JAYENDRA & SAROJ SHAH
GOVIND & BHAKTI NADKARNI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
MAHARSHI KARVE FOUNDATION 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. CT SCAN AHMADNAGAR MH
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S.SAMITI, PUNE,PATHAK TRUST
COSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESHWAR MAHILA MANDAL
NIH
SAFETY CLUB, HYDERABAD, A.P.
G.D.TRUST
FUJI MAMMOGRAPHY-M P SHAH MEDICAL COLLEGE, JAMNAGAR, GUJARAT
M P SHAH MEDICAL COLLEGE
MAMMOGRAPHY EQUIPMENT
GIVING 200 TESTS A WEEK (10,400 A YEAR) FOR WOMEN TOWARDS EARLY DETECTION AND INTERVENTION WHICH IS NOT AVAILABLE IN NEARBY HOSPITALS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
M P SHAH MEDICAL COLLEGE SCHOLARSHIPS
SHANTA DURGA TEMPLE, KAVLEM, GOA

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address:

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**



बृहन्महाराष्ट्र मंडळ



**नाते जुळते मनाशी मनाचे**




*Reshimgathee*

**A BMM Matrimonial Initiative for Maharashtrians in North America**

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning" progressive curriculum, study guidelines, and supporting materials the BMM-Bharati Vidyapeeth's joint certificates for "Marathi Bhasha" examinations after successful completion of each level and passing criteria.

For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- contact.bmmshala@gmail.com
https://bmmshala.net/

# बृहन्महाराष्ट्र वृत्त - पुरवणी

## जानेवारी, २०२३

### -(बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)-

**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

# सण संक्रांत



- **प्रिया गोडबोले** (एडिसन, न्यू जर्सी)

## सण संक्रांत

मखमली काळ्याशार राती,  तलम धुक्याचे हळुवार अस्तर
शिंपडलेल्या प्राजक्तापरी, लख्ख चांदण्यांचा बहर
बिलगुनी पानन्-पान शहारे, शीतल पवन देऊनी झोके
अशाच एका पौष शुभघडीस, सण संक्रांतीचे गाऊ गोडवे

उषःकाली नूतन दिवशी, अर्घ्य देऊनी सवितेला
धनु राशीचक्रातुनी भ्रमति,  मकरेतल्या सफरीला
ह्याच दिवशी उतू जाऊदे, स्वकीयांची स्नेही मने
झटकुनी सारी किल्मिषे, जपूनी जुने, स्वीकारूनी नवे

महती वाखाणण्याजोगी, विणलेल्या कृष्ण वसनांची
रेशमाने गुंतलेल्या, दिप्तवर्ण रेघोट्यांची
जरतारी त्या पदरावरती, मोर युगुल नाचरे नवे
अञ्जन वस्त्र लेवून ललना, साजिरी दिसे गोजिरी दिसे

हस्ताकृतीतुनी घडविलेले, आखीव रेखीव शुभ्र गोलक
सुवर्णालंकाराहुनी सुंदर, लोलकाहुनी मोहक सुबक
नखशिखांत सजुनी नर नारी,  नाजूक ती आभूषणे धारुनी
स्तुती शर्करेच्या हलव्याची, का निपुण त्या मणिकाराची?

सायंकाळी दिवे लागणी, सडा अंगणी रांगोळी
नैवेद्यासी तीळ गुळाची, शाक सुगीची समृद्धी
वाण सुगडीचे, मधुर वाणीचे, वचन देऊ एकमेकांशी
अन् उत्तरायणास आरंभितो जो, नमन करू त्या सूर्यासी !

***

# ‘मराठी विश्व न्यू जर्सी’- ‘विश्वांकुर’ आणि ‘क्लब 55’चा उपक्रम

## ‘साडी/लेडीज इंडियन आऊटफिट (डोनेशन) ड्राईव्ह’

### काही क्षणचित्रे







